जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३८१ दिनांक - १६/०९/२०२४**

येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर

**परदेशी नागरीकाला लुबाडणा-या आरोपीच्या १२ तासाचे आत आवळल्या मुसक्या**

दि.१४/०९/२०२३ रोजी शास्त्रीनगर चौक येथे परदेशी नागरीक हे पायी चालत असताना मोटार सायकल वरुन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचा मोबाईल जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेला आहे म्हणून येरवडा पो. स्टे. गु. र. नं. ५९५/२०२४ बीएनएस ३०४(२),३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास करत असताना तपास पथकाचे पोलीस अंमलदार किरण घुटे यांनी तांत्रिक विश्लेषण करुन व तुषार खराडे, सुरज ओंबासे यांनी सीसीटीव्ही फुटेज वरुन आरोपी निष्पन्न केले. सदरची कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे तपास पथकाचे अधिकारी सपोनि सुनिल सोळुंके व स्टाफ यांनी सदर जावुन संशयीत दोन इसमांना पळून जात असताना अतिशय पकडुन त्यांना त्याचे नाव पत्ता याचेबाबत खात्री करता तो विधीसंघर्षित बालक असल्याचे समजले. त्यांचेकडे चौकशी करता त्यांनी चोरी त्याचे इतर तीन साथीदारसह केल्याचे कबूली दिली आहे. त्यांचेकडून गुन्हयातील चोरीस गेलेला ३०,०००/- किंमतीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री मनोज पाटील, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, श्री हिम्मत जाधव, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-४, श्रीमती प्रांजली सोनवणे सहा. पोलीस आयुक्त येरवडा विभाग, श्री. रविंद्र शेळके, वपोनि येरवडा, पल्लवी मेहेर, पोनि गुन्हे, येरवडा यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी सपोनि सुनिल सोळुके, पोहवा दत्ता शिंदे, तुषार खराडे, किरण घुटे पोना सागर जगदाळे, पोअं अनिल शिंदे, सुरज ओंबासे, दत्तात्रय शिंदे, प्रशांत कांबळे, सुशांत भोसले, विठ्ठल घुले, विजय अडकमोल यांनी केलेली आहे.


पोलीस स्टेशन पुणे शहर
येरवडा पोलीस स्टेशन